# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.10.2024** **वार – बुधवार**

---

**कक्ष**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कामकाजासाठी चिंचवड मतदारसंघाच्या थेरगाव इथल्या निवडणूक कार्यालयात विविध प्रकारच्या परवानगींसाठी एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी ही माहिती दिली. चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये महिला, युवा, दिव्यांग, विशिष्ट आणि, मॉडेल मतदान केंद्र अशी 5 प्रकारची मतदान केंद्रं निश्चित करण्यात आली आहेत.

**शपथ-तहसीलदार**

पुण्यात दापोडीमध्ये आनंदवन या ठिकाणी असलेल्या कुष्ठरोग वसाहतीमध्ये निवडणूक कार्यालयामार्फत जनजागृती कारण्यात आली. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू अशी शपथ उपस्थित मतदारांनी घेऊन 100 टक्के मतदानाचा निर्धारही केला. अशा प्रकारचा हा या वस्तीतील पहिलाच कार्यक्रम असल्याचं स्थानिक मतदारांनी सांगितलं. आनंदवनमध्ये 150 पेक्षा जास्त घरं असून 350 हून अधिक मतदार आहेत. निवडणूक विभागाकडून प्रत्येक निवडणुकीत इथल्या मतदारांनी व्हीलचेअर, मदतनीस तसंच मतदान केंद्रावर सहकार्य दिलं जातं.

**उमेदवारी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आज उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. यात हडपसर मतदार संघात विद्यमान आमदार चेतन तुपे, मावळमधून सुनील शेळके, आणि जुन्नरमधून अतुल बेनके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे काल उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. यात कोथरूडमध्ये माजी नगरसेवक किशोर शिंदे, हडपसरमध्ये माजी नगरसेवक साईनाथ बाबर तर खडकवासल्यातून मयुरेश वांजळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेनेतर्फेही काल उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. मात्र या यादीत पुणे शहर आणि जिल्ह्यातील एकही उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही.

**संभाजी ब्रिगेड**

राज्यात संभाजी ब्रिगेड स्वबळावर निवडणूक लढणार असून पन्नासपेक्षा अधिक उमेदवार देणार असल्याची माहिती ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे आणि मुख्य प्रवक्ते डॉक्टर गंगाधर बनबरे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान 4 ते 5 जागा देण्याचं आश्वासन दिलं होतं, परंतु आश्वासनानुसार जागा दिल्या नसल्याचा आरोप आखरे यांनी केला.

**भवाळकर**

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष स्त्री आहे की पुरुष याचा संबंध नाही, अध्यक्षपदासाठी व्यक्ती लायक आहे की नाही हे बघितलं गेलं पाहिजे, असं स्पष्ट मत साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉक्टर तारा भवाळकर यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. दिल्ली इथं होणाऱ्या 98व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉक्टर भवाळकर यांचा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मुंबई आणि सरहद, पुणे यांच्यातर्फे आज जाहीर सत्कार करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला ही आनंदाची बाब असली तरी मराठी माणसांनी मराठी भाषा बोलली, लिहिली आणि वाचल्याशिवाय मराठी भाषा टिकणार नाही असंही भवाळकर यांनी सांगितलं.

**माध्यम**

वर्तमान काळात समाज माध्यमाद्वारे मानव एक-दुसऱ्याशी जुळलेला आहे, मात्र त्याचं नियंत्रण कसं करावं याचा विचार केला पाहिजे असं मत माजी सनदी अधिकारी रवी कपूर यांनी आज पुण्यात एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या  माध्यम शाळेतर्फे आयोजित सहाव्या राष्ट्रीय माध्यम आणि पत्रकारिता परिषदेत व्यक्त केलं. पुणे श्रमिक पत्रकार संघ, आर. के.लक्ष्मण संग्रहालय आणि  दिल्लीच्या परदेशी पत्रकार क्लबच्या सहयोगानं ही परिषद घेण्यात आली.

**मागणी**

वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांना घोषित केल्यानुसार 19 टक्के पगारवाढ द्यावी अशी मागणी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघानं केली आहे. संघाचे प्रदेश अध्यक्ष निलेश खरात आणि प्रदेश सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी पुण्यात एका पत्रकाद्वारे ही मागणी केली आहे.

**पुरस्कार**

चित्रपटसृष्टी विकसित झाली आहे तरी त्याला उद्योगाचा दर्जा मिळत नाही. ताण-तणाव विसरण्यासाठी उद्योजक आमचा उपयोग करून घेतात पण तरीही चित्रपट क्षेत्राला उद्योगाचा दर्जा नाही. या क्षेत्रालाही व्यवसाय म्हणून पाहिलं पाहिजे, असं मत अभिनेता-निर्माता- दिग्दर्शक प्रसाद ओक यांनी पुण्यात व्यक्त केलं. याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियानाच्या वर्धापनदिनानिमित्त पुण्यातील टिळक स्मारक मंदिर इथं नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते प्रसाद ओक यांना युवा कलाकार तर सर्वत्र टेक्नॉलॉजीजचे संस्थापक मंदार आगाशे यांना चंद्रकांत जोशी स्मृति युवा उद्योजक पुरस्कारानं सन्मानित आले.

**हवामान**

पुण्यात अनेक दिवसांनी आकाश निरभ्र राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. कमाल तापमान 34 अंश सेल्सियस राहील. म्हणजे ऑक्टोबर संपता-संपता ऑक्टोबर उष्णता अनुभवाला येत आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**